# पुण्य नगरी

## यवतमाळ नगर परिषद, यवतमाळ

कार्यालय दुरध्वनी क्र. : (०७२३२) २४४०३७, २४७५६६ ई मेल आय.डी. : - npyavatmal@gmail.com

जा.क्र./य.न.प./ सार्प्रवि/१७४९/२०२४-२५ दि. : ३१/०१/२०२५

**जाहीर सूचना**

**''महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५''**

**''अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित सेवा देणेबाबत''**

सर्व नागरिकांना, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच केंद्रीय कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, लोकसेवा हमी कायद्यातंर्गत नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे प्रत्यक्ष ७० लोकसेवांची यादी प्रसिद्ध केलेली आहे. तसेच वेळोवेळी नवीन लोकसेवा यादी प्रसिद्ध करून नगर प्रशासन विभागाला दिली जाते. त्यानुसार सर्व पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ नुसार विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रासह सादर केल्यास नगर परिषद यवतमाळ कडून आवश्यक लोकसेवा विहित मुदतीत दिली जाते. याकरिता नगरपरिषद यवतमाळ तर्फे पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या लोकसेवांची यादी यवतमाळ नगर परिषदेच्या नोटीस बोर्ड वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

स्वा/-
**मुख्याधिकारी**
नगर परिषद यवतमाळ

Nagpur Edition

Feb 06, 2025 Page No. 07

Powered by: erelego.com

Scanned with OKEN Scanner